# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- २७/०८/२०१८

## त्रंबकेश्वर व कळवण येथे लुटमार व घरफोडी करणारे गुन्हेगार जेरबंद
## ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकाची कारवाई

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हयातील मालाविरूध्दचे गुन्हे (दरोडा, जबरीचोरी, घरफोडी व चोरी) उघडकीस आणणेसाठी अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो. यांचे गुन्हे शोध पथक कार्यरत आहे. पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना जिल्हयातील नाउघड गुन्हयांची उकल करणेसाठी आदेशित केले होते.

त्यानुसार गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्री. अविनाश गडाख यांचे पथकाचा जिल्हयातील मालाविरूध्दचे गुन्हे उघडकीस आणणेसाठी समांतर तपास सुरू होता, दरम्यान गेल्या हप्त्यात कळवण शहरात रात्रीचे वेळी घरफोडी करणारे गुन्हेगारांची गोपनीय माहिती गुन्हे शोध पथकास मिळाली होती. त्यावरून पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी धुळे जिल्हयातील संशयीत इसम नामे **१) विजय उर्फ विजु निंबाजी बाविस्कर, रा. अकलाडे-मोराणे, ता.जि.धुळे** यास त्याचे कब्जातील पांढरे रंगाची मारूती स्विफ्ट डिझायर कार क्र. एम.एच.१५.ई. ७६७० या वाहनासह ताब्यात घेण्यात आले. ताब्यात घेतलेले इसमास विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्याने त्याचा साथीदार नामे २) भिका सदु भोई, रा. लोंढाणाला, ता.जि.धुळे याचे सह गेल्या महिन्यात कळवण शहरातील सरकारी दवाखाना परिसरातील ऑटोमोबाईल्स व मेडीकलची दुकाने फोडुन मोटर सायकलीचे स्पेअरपार्टस्, विविध कंपन्यांचे टायर्स तसेच रोख रक्कम घरफोडी चोरी करून नेल्याची कबुली दिली आहे. सदर आरोपीचे कब्जातुन गुन्हयात वापरलेली स्विफ्ट डिझायर कार.क्र. एम.एच.१५.ई.७६७० हे वाहन जप्त करण्यात आले असुन सदर आरोपीचा दुसरा साथीदार भिका सदु भोई हा साक्री पो.स्टे. जि.धुळे येथे दाखल असलेले घरफोडीचे गुन्हयात अटक आहे. आरोपी नामे विजय बाविस्कर याने कबुली दिलेवरून कळवण पोलीस ठाणेस दाखल असलेले घरफोडीचे ०२ गुन्हे उघडकीस आलेले आहे. वरील दोन्ही आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन त्यांचेकडुन घरफोडीचे अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

तसेच दिनांक २६ ऑगस्ट रोजी पथकातील अधिकारी त्रंबकेश्वर पोलीस ठाणेस दाखल असलेले जबरी लुटमारीचे गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार गुन्हे शोध पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी त्रंबकेश्वर शहरातुन संशयीत नामे **१) मयुर दत्तु बोडके,** वय २०, रा. तळवाडे, ता.त्रंबकेश्वर, **२) तुषार मंगळु टोपले,** वय १९, रा. राजेवाडी, ता.त्रंबकेश्वर यांना ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमांना पोलीसी खाक्या दाखविताच त्यांनी त्यांचे साथीदार नामे ३) अनिल रंगनाथ भगत, रा. मुळेगाव, ता. त्रंबक, ४) भुषण कसबे, रा. माळेगाव, जि.नाशिक यांचेसह गेल्या हप्त्यात रात्रीचे सुमारास त्रंबकेश्वर शहरातील गंगाव्दारकडे जाणारे रोडवर एका जोडप्यास अडवुन चाकुचा धाक दाखवुन त्यांचे अंगावरील सोन्या चांदिचे दागिने, रोख रूपये व मोबाईल फोन जबरीने लुटमार केले असल्याची कबुली दिलेली आहे. सदर आरोपींने कबुली दिलेवरून त्रंबकेश्वर पोलीस ठाणेकडील I गुरनं ८५/२०१५ भादवि कलम ३९२,३२३,३४ हा गुन्हा उघडकीस आलेला आहे. ताब्यात घेतलेले इतर दोन साथीदारांचा पथकातील अधिकारी व कर्मचारी शोध घेत असुन त्यांचेकडुन अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व **अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो.** यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्री. अविनाश गडाख, पोना प्रमोद मंडलिक, पोना आहेरराव, पोकॉ कुणाल मराठे यांचे पथकाने घरफोडीचे ०२ व जबरी चोरीचा ०१ असे एकुण ०३ गुन्हे उघडकीस आणुन कामगिरी केली आहे.